# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २१ ऑक्टो. २०२४

---

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने सकारात्मक विचार हा व्यावसायिक उत्कृष्टतेचा मार्ग आहे या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

राष्ट्रीय तांत्रिक शिक्षक प्रशिक्षक व संशोधन संस्थेचे डॉ.राजेश खंबायत यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना व्यक्तिमत्व आणि दृष्टिकोन याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रशाळेच्या संचालक डॉ.मधुलिका सोनवणे, डॉ.आर.आर.चव्हाण, प्लेसमेंट समन्वयक प्रा.रमेश सरदार उपस्थित होते. मेघना वारडे व ऋषीकेश अस्वार यांनी सूत्रसंचालन केले. प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेसाठी ८३ विद्यार्थी सहभागी झाले होते.

बातमी क्र.२

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली असून गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.के.एफ. पवार यांच्या हस्ते झाले.

प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. अशा उपक्रमातून प्राध्यापकांच्या विचारांची, वाचनाची नवीन संकल्पनेची देवाण घेवाण होते. समतोल राखण्याचे काम मानवविज्ञान शाखा करीत असते असे ते म्हणाले. प्रा.म.सु.पगारे यांनी प्रबोधिनीची कल्पना नाविन्यपूर्ण असून यातून प्राध्यापकांचे व्यक्तिमत्व, वाचन व संशोधन प्रक्रिया यांचा विकास होतो असे मत व्यक्त केले. प्रा. प्रतिभाा गलवाडे यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

बातमी क्र.३

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण आणि भूशास्त्र प्रशाळेच्यावतीने जागितक भू विज्ञान सप्ताह साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थ्यांव्दारे, विद्यार्थ्यांसह जिओ विज्ञान या संकल्पनेवर आधारित वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्व क्षमता, शाश्वत विकास, हवामान बदल, पर्यावरणावरील घडामोडींचे परिणाम, पाणी व्यवस्थापन, खनिज संसाधने आदी विषयांवर चर्चा झाली. प्रशाळेचे संचालक प्रा.एस.एन.पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या निमित्ताने घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत नेहा शिरसाठ, प्रश्नमंजुषा स्पर्धेत रुचिता खैरनार, पोस्टर सादरीकरणात निकीता पाटील व मोहिनी आहेर, वादविवाद स्पर्धेत कल्याणी क्षीरसागर यांनी पारितोषिक प्राप्त केले. पर्यावरण विभागाचा संघ खजिना शोध स्पर्धेत तर उपयोजित भूशास्त्र विभागाचा संघ पथनाटय स्पर्धेत विजेते ठरले. प्रतिक पवार, राखी शिरसाठ, पूजा पाटील, प्रदीप पवार, समीर तडवी, रोशनी चौधरी व राजेश्वरी पाटील हे विद्यार्थी सर्वोत्तम स्वयंसेवक ठरले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी**